# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

Approved by : University Grant Commission (UGC)

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL


www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Volume-IV Special Issue - I ISSN : 2454-8499 January 2018

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)


## SPECIAL ISSUE ON
## बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा



INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal. Shirur Dist. Pune.



Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

## INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Country/ State/City | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | अत्रे यांच्या कथामधील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ. जगदीश दिनकर शेवते | नसरापूर | 1 |
| 2 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी (ग्रामीण) कथा | बाळासाहेब शांताराम देविकर, डॉ. बाळकृष्ण लळीत | शिरूर | 4 |
| 3 | सांस्कृतीक पर्यावरण आणि मराठी कथा | प्रा.डॉ.रामीलाला सुदामराव पवार | तीर्थपुरी | 10 |
| 4 | विजया वाड यांच्या 'ऋणानुबंध' कथासंग्रहातील जेष्ठ नागरीकांचे प्रश्न | प्रा. डॉ. सौ. मंगल डोंगरे | नारायणगाव | 15 |
| 5 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा | प्रा. कांबळे विजया | पिरंगुट | 22 |
| 6 | मालवणी कथेतील स्त्री : सांस्कृतिक दर्शन | प्रा. डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत | शिरूर | 26 |
| 7 | 'सांस्कृतिक पर्यावरणातील घडामोडी आणि कथेतील वास्तव' | प्रा.डॉ.सुनील निगडे | वरवंड | 30 |
| 8 | सांस्कृतिक पर्यावरण आणि कथा : सहसंबंध | प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | पुणे | 35 |
| 9 | सदानंद देशमुखांच्या कथेमधील बदलते सांस्कृतिक पर्यावरण | प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस | पुणे | 38 |
| 10 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि लेखकाची भूमिका. | डॉ. उमा काळे – माळी | पुणे | 46 |
| 11 | चारूता सागर यांचा कथेतील सांस्कृतिक पर्यावरण | प्रा.डॉ. प्रतिभा शंकर घाग | शिक्रापूर | 48 |
| 12 | सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी स्त्रियांची कथा | प्रा. डॉ भवारी हनुमंत लक्ष्मण | पाबळ | 52 |
| 13 | 'सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा' | प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने | वरवंड | 59 |
| 14 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा | प्रा.वाडेकर छाया किसनराव | जालना | 63 |
| 15 | "सांस्कृतिक पर्यावरण–लोकगीते आणि स्त्रीजीवन एक अनुबंध...!" | प्रा. डॉ.मधुकर गणेश मोकाशी | राहू | 64 |
| 16 | "वैदु जमातीचा लोकसांस्कृतिक अनुबंध !" | प्रा. डॉ.मधुकर गणेश मोकाशी | राहू | 69 |
| 17 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा | प्रा .कल्पना तबाजी रोकडे | जेजुरी | 71 |
| 18 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी मुस्लिम कथा साहित्याच्या प्रेरणा | डॉ. पांडुरंग कंद | पुणे | 76 |


*

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

# सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी स्त्रियांची कथा

प्रा. डॉ भवारी हनुमंत लक्ष्मण
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय, पाबळ, ता. शिरुर, जि. पुणे.

## आदिवासी साहित्य आणि सांस्कृतिक पर्यावरण

साठोत्तरी इतर साहित्य प्रवाहांबरोबर आदिवासी साहित्यप्रवाह निर्माण झाला. इ.स.१९७८ साली झालेल्या पहिल्या अखिल भारतील आदिवासी साहित्य संमेलनापासून खऱ्या अर्थाने साहित्य चळवळ सुरू झाली. आदिवासी साहित्य नावारूपाला येऊ लागले. आदिवासी साहित्याचा सवता सुभा कशासाठी? किंवा आदिवासी साहित्याने वेगळी चूल मांडली. अशी चर्चा होतांना दिसू लागली. मूळात आदिवासी साहित्य कशाला म्हणायचे? हाही प्रश्न महत्त्वाचा होताच, जन्माने आदिवासी असणाऱ्या साहित्यिकाने निर्माण केलेल्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणायचे की, बिगर आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणायचे? अशा प्रकारे वादविवाद चालू झाले.

आदिवासी साहित्य संमेलने, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मेळावे यांच्यामुळे अनेक आदिवासी लेखक, कवी एकत्र येऊ लागले व आदिवासी साहित्य या विषयावर ऊहापोह होऊ लागला. आदिवासीच्या जीवन जाणिवा वेगळ्या आहेत. त्यांची संस्कृती त्यांची जीवन जगण्याची पद्धत वेगळी आहे. त्याचबरोबर त्यांची आविष्काराची पद्धतही वेगळी आहे. प्रस्थापितांच्या तंत्रामध्ये आदिवासी साहित्य कोठेही बसत नाही. ते स्वतंत्र प्रज्ञेने निर्माण झालेले आहे. त्यामुळे त्या साहित्याचा वेगळाच विचार करावा लागेल. असे म्हणणारा एक प्रवाह निर्माण झाला. त्या प्रवाहामध्ये विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, गोविंद गारे, वाहरू सोनवणे, या मंडळींनी पुढाकार घेतला आणि आदिवासी साहित्यप्रवाह स्वतंत्ररित्या आपले पाय रोवू लागला.

"आदिवासी दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत, त्याचे प्रश्न वेगळे राहणार आहेत. त्याची उत्तरे सुद्धा वेगळ्या पद्धतीने शोधावी लागतील, वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील, म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो आणि हे साहित्य म्हणजे आमच्या वैशिष्ट्यांचा शोध देखिल ठरतो. फक्त साहित्याचा नव्हे तर आदिवासी समुहाचा आणि जीवनाचा शोध."[१]

या संदर्भात गोविंद गारे म्हणतात, "अलिकडच्या काळात आपण अनेक साहित्य संमेलनांची व साहित्य प्रकारांची चर्चा ऐकतो. ग्रामीण साहित्य, बाल साहित्य, दलित साहित्य, लोकसाहित्य या साहित्याचा पुरस्कार करणाऱ्या अनेक परिषदाही होतात. तसेच हे एक आदिवासी साहित्य संमेलन आहे. आदिवासी साहित्य संमेलन हा वेगळा आणि सवता सुभा पुन्हा कशाला? असेही कोणी म्हणेल. तेही खरेच, पण हा सवता सुभा मात्र नाही. तो आदिवासी समाजातून उदयाला येणाऱ्या साहित्यिकांचा व साहित्यप्रेमी मंडळींचा एक मनसुबा आहे."[२]

आदिवासी साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे म्हणून आदिवासी साहित्य परिषद, महाराष्ट्र (नागपूर) ही संस्था निर्माण झाली. महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक एकत्र आले त्यामध्ये ऋषी मसराम, बाबाराव मडावी, या मंडळींनी इ.स.१९७९ मध्ये या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या माध्यमातून साहित्य संमेलने होऊ लागली. त्यानंतर अनेक छोटी-मोठी मंडळे निर्माण झाली व साहित्य संमेलने, सांस्कृतिक मेळावे, आयोजित करू लागले. त्यामुळे आदिवासी साहित्याचा प्रचार व प्रसार होऊ लागला.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur Dist.Pune

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

सुरूवातीच्या काळात आदिवासी साहित्यालाही दलित साहित्यासारखा संघर्ष करावा लागला. प्रस्थापितांच्या तंत्राच्या परीक्षेला उतरावे लागले. परंतु आता स्वातंत्र्यामुळे, शिक्षणामुळे, आत्मभानामुळे त्यांच्या अनुभवकक्षा विस्तारल्या आणि नव्या दमाचे साहित्य निर्माण होऊ लागले. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, नाटक, ललित गद्य हे साहित्यप्रकार हळूहळू हाताळले जाऊ लागले. आतापर्यंत एकूण दहा अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलने झाली आहेत. त्याच बरोबर राज्यस्तरीय आदिवासी साहित्य संमेलने, विचारवेध संमेलने, साहित्यिक मेळावे अशा प्रकारे आदिवासी साहित्य चळवळ जोमाने पुढे चालली आहे.

वाहरू सोनवणे म्हणतात, ''गुलाम भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढाईत खाज्या नाईक, तंट्या भिल्ल, रामदास महाराज, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती इ. अशा अनेक आदिवासी क्रांतीवीरांनी ब्रिटिश राज्याविरूद्ध झुंज दिली अनेक आदिवासींनी स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले पण प्रस्थापित इतिहासकारांनी इतिहासात आदिवासी वीरांची दखल घेतली नाही. कोणी आदिवासी स्वातंत्र्य सैनिक आहेत असेही ऐकीवात नाही. आज असे सांगण्यात येते की, आदिवासींनी आता मुख्य प्रवाहात यायला हवे. मला इथे प्रश्न पडतो की, हा मुख्य प्रवाह कोणाचा आहे? कोणी बनवला आहे, कोणीतरी प्रवाह तयार करायचा आणि त्यात आदिवासींनी सहभागी व्हायचे, हे जमायचे नाही ज्या प्रवाह निर्मितीत आमचा सहभाग असेल आणि त्या प्रवाहात आदिवासींना न्याय मिळत नसेल त्यात सहभागी होणार नाही. आदिवासींना न्याय मिळेल असा प्रवाह आज तरी दिसत नाही.''[३]

त्यामुळे आदिवासी साहित्यप्रवाहाच्या स्वतंत्र अस्तित्त्वाची गरज आहे. हा साहित्यप्रवाह आता स्वतंत्र भूमिका मांडू लागला आहे. परंतु अजूनही त्याची स्वतःची स्वतंत्र मूल्यमापन पद्धती निर्माण झाली नाही. प्रस्थापित साहित्याच्या तंत्र पद्धतीतच त्याचे ही मोजमाप केले जाते.

**आदिवासी स्त्रियांची कथा**

आदिवासी कवितेनंतर आदिवासी कथा हा वाड्मयप्रकार आदिवासी साहित्यविश्वात रूजू पाहतो आहे. बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासींचे जीवन चित्रण करणाऱ्या अनेक कथा लिहिल्या आहेत. दिवाकर कृष्ण, महाश्वेतादेवी, श्री. म. माटे, वामन चोरघडे, बाबुराव बागुल, साने गुरुजी ही बिगर आदिवासी कथाकारांची महत्त्वाची नावे आहेत. त्या तुलनेत आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कथा अत्यल्प आहेत. बिगर आदिवासी लेखकांनी या कथांमधून आदिवासी जीवनाची ओळख करुन दिली, हे वास्तव नाकारुन चालणार नाही. आता आदिवासी कथाकार मात्र आदिवासींच्या जीवनजाणिवा त्यांचे वास्तवचित्र कथांतून मांडताना दिसतात. उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, कुंडलिक केदारी व नजुबाई गावित ही आदिवासी कथा लेखनातील महत्त्वाची नावे आहेत.

यासंदर्भात डॉ. विनायक तुमराम म्हणतात,''मराठी कथावाड्मय हे सागरासारखे अफाट आहे. मराठी कथाकारांची संख्याही तशी मोठीच आहे. मराठी वाड्मय विकास कसा होत गेला. कथेचे प्रकार कोणते याविषयी विस्तृत चिकित्सक लेखन यापूर्वी झालेले आहेच. अनेक अभ्यासकांनी कथावाड्मयाचा चिकित्सक अभ्यास करुन ग्रंथ सिद्ध केले आहेत. परंतु या अफाट मराठी कथासागराचा तळ हुडकून काढला असता, क्वचित एखाद्या शिंपल्यात मोती सापडावा तसे आदिवासी कथेचे मोती धारण करणारे मराठी कथाशिंपले संख्येने फार विरळ आहेत.''[४]



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

आपण या प्रकरणामध्ये उषाकिरण आत्राम यांचा इ.स.१९९६ मध्ये प्रकाशित झालेला 'अहेर' आणि नजुबाई गावित यांचा इ.स. २०१३ रोजी प्रकाशित झालेला 'नवसा भिलणीचा एल्गार' या दोन स्त्रियांच्या कथासंग्रहांचा विचार येथे करणार आहोत. यातील पहिली लेखिका म्हणजे उषाकिरण आत्राम यांनी इ.स.१९९६ मध्ये 'अहेर' नावाचा कथासंग्रह लिहून आदिवासी साहित्यात कथा लेखनास सुरुवात केली. आदिवासी काव्याच्या प्रांतात जशा त्या 'म्होरकी' ठरतात. त्याचप्रमाणे एकूण आदिवासी कथालेखनाची मुहूर्तमेढ सुद्धा त्यानीच रोवलेली दिसते. म्हणून 'अहेर' हा आदिवासी कथासाहित्यातील पहिला कथासंग्रह. लेखिका 'उषाकिरण आत्राम' यांनी 'हाकारा' आदिवासी भारत या मासिकांमधून यापुर्वीही लेखन केलेले आहे. त्यांच्या 'अहेर' या कथासंग्रहामध्ये अहेर, बाजा, जनी, संघर्ष, परिवर्तन आणि भूक अशा एकूण सहा कथांचा समावेश केला आहे. त्यांच्या 'अहेर' या कथासंग्रहाबाबत प्रस्तावनेमध्ये डॉ. इंदूमती लहाने म्हणतात, "उषाकिरण आत्रामांच्या 'अहेर' कथासंग्रहात गोंडीयन जीवनाचे स्त्रीवादी साहित्याचे सृजनशील चित्रण पाहावयास मिळते. उषाकिरण कथालेखन, कविता लेखन करुनच थांबत नाही तर सामाजिक जाणिवांचे यांना चांगले भान असल्याने स्त्रियांचे प्रश्नही त्या हाताळताना दिसतात. स्त्रीमुक्तीच्या सक्रीय कार्यकर्त्या, पुरोगामी विचार व सामाजिक जाण असलेल्या लेखिकांमध्ये त्यांची गणना करावी लागेल. 'अहेर' मधील कथा ह्या त्यांच्या जाणिवांच्या स्वानुभवातून केलेल्या यातनांची ही गोळाबेरीज आहे."[५] डॉ. इंदूमती लहाने यांच्या मतानुसार आत्राम यांचे सामाजिक भान चांगले असल्यामुळे त्यांच्या कथांमधून स्त्रियांचे हे जीवन वास्तव हुबेहूब चित्रीत केलेले दिसते. उषाकिरण आत्राम यांची भाषाशैली, वातावरणनिर्मिती कथेमध्ये समरस होण्यास भाग पाडते. कवितांबरोबरच कथेच्या प्रांतामध्ये एक महत्त्वपूर्ण नाव म्हणून 'उषाकिरण आत्राम' यांची दखल कथा साहित्याला घ्यावी लागेल यात तिळमात्र शंका नाही.

स्त्रियांच्या कथालेखन क्षेत्रातील दुसरे महत्त्वाचे नाव म्हणजे नजुबाई गावित यांच्या नावावर 'तृष्णा' आणि 'भिवा फरारी' अशा दोन कादंबऱ्या आहेत. 'आदोर' हे आत्मकथनाच्या रुपात सुरुवातीला प्रसिद्ध झाले होते. परंतु नंतर 'तृष्णा' या आत्मवृत्तपर कादंबरीमध्ये त्याचा समावेश केला आणि आता इ.स.२०१३ मध्ये त्यांनी 'नवसा भिलणीचा एल्गार' हा कथासंग्रह लिहून कथा लेखनामध्ये नुसतीच भर टाकली नाही, तर कथालेखक म्हणून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. या कथासंग्रहामध्ये 'जवानीमा किसबीण, धयडपणमा डाकीण', 'मी ह्येर ना, नदी सय'! 'बांबूची मोळी', 'जानकीची सीता'!, 'कुतरखांब', 'भुताळ्या', 'नवसा भिलणीचा एल्गार' अशा एकूण सात कथांचा समावेश केला आहे. नजुबाई गावित यांच्या कथांमधून आदिवासी स्त्रियांची स्थिती, त्यांचे जगण्यातील स्थान, समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन या गोष्टी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. समाजवास्तवांची सूक्ष्म जाण त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यांच्या कथासंदर्भात प्रस्तावनेमध्ये डॉ. रुपा कुलकर्णी-बोधी म्हणतात, "एकीकडे सर्व सुविधांचा उपभोग घेणारा सुविधाभोगी समाज, तर दुसरीकडे दोनवेळचं पोटभर खाणं, अंगभर कपडा व डोक्यावर एक स्वतःच्या मालकीचं छोटस छप्पर यांना मोताद असलेला ढोरमेहनत करणारा कष्टकरी समाज यांच्यातली दरी वाढतच आहे. देशाचा आर्थिक विकासदर ८% टक्के वर जाऊनही सामाजिक विकासदराची अवस्था किती चिंताजनक आहे याचं प्रत्ययकारी चित्रण कॉम्रेड नजुबाई गावित यांनी या कथासंग्रहात रेखाटलं आहे आणि एका परीनं, शासनकर्ते, सुखासीन समाज आणि सामाजिक संस्था-संघटना यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातलेलं आहे"[६] समाज व्यवस्थेतील ही विषमतेची दरी समाज विकासातील फार मोठा अडसर ठरते डॉ. रुपा कुलकर्णी यांचे मत अगदी रास्तच आहे. अशा दोन कथालेखिकांच्या कथांमधून आदिवासी स्त्रियांचे भावविश्व,

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

आदिवासींचे जीवनवास्तव, जमीनदार सावकार यांचे वर्चस्व अंधश्रद्धा, रुढी परंपरा व भूकेचे चित्रण असे विषय या कथासंग्रहामधून मांडलेले दिसतात. या कथांच्या आशयसौंदर्याबरोबरच त्यांचे वाङ्मयीन मूल्यमापनही याच प्रकरणात केले जाणार आहे.

## सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी स्त्रियांची कथा

आदिवासी समाजामध्ये अशिक्षितपणाचे प्रमाण अधिक असल्यामुळे अंधश्रद्धेला तो बळी पडताना दिसतो. त्याचबरोबर परंपरांनुसार चालत आलेल्या रुढीही त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करतात. पेशवे काळापासून चालत आलेल्या काही प्रथा आदिवासींच्या स्वातंत्र्यावर, चारित्र्यावर घाला घालणाऱ्याच आहेत. अंधश्रद्धेमुळे एकीकडे समाज धार्मिकतेच्या नावाखाली कर्मकांडात अडकून पडलाय तर दुसरीकडे भगत, देवऋषी स्वतःच्या तुंबड्या भरताना दिसतोय. या दोन्हीही गोष्टीमुळे आदिवासी समाज विकासाच्या बाबतीत मागे पडतोय. म्हणून या कथांमधून लेखिका नजुबाई गावित 'भुताळ्या' या अंधश्रद्धेच्या प्रकारावर भाष्य करतात तर लेखिका उषाकिरण आत्राम यांनी 'अहेर' या कथेमधून अहेराच्या नावाखाली जमीनदाराकडून आदिवासी स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे.

नजुबाई गावित यांनी 'भुताळ्या' या कथेमधून अंधश्रद्धेच्या एका नव्या प्रकारावर भाष्य केले आहे. सावरीपाड्याच्या भिकाचे दोन बैल एकाएकी मरतात, त्यामुळे गाव अस्वस्थ होते. ही भुताळ्यांचीच करामत असावी असे गावातील प्रमुख कारभारी दाजी सगळ्यांना सांगतो, मग प्रवास सुरु होतो, भुताळ्यांच्या शोधाचा. मंगळ्या नावाच्या भगताकडून भूताळ्यांचा शोध घेतला जातो. शिड्या, बणा, सजरी व गजरी, यांना भुताळ्या म्हणून ठरविले जाते. त्यांना झाडाला उलडे बांधून चाबकाचे फटके दिले जातात. त्यांच्याकडून गुन्हा कबुल करुन घेऊन त्यांना शिक्षाही दिली जाते. त्यांना गाव सोडावे लागते. अशा अनेक अनिष्ट प्रथेला तो बळी पडताना दिसतो आहे. 'भुताळ्या' या कथेसंदर्भात डॉ. रुपा कुलकर्णी म्हणतात, "अमानुष अशी ही न्यायदानाची पद्धत, शिक्षा देण्याचे अघोरी प्रकार आजही दुर्गम भागात राहणाऱ्या गरीब बिचाऱ्या भिल्ल आणि तत्सम आदिवासी जमातीमध्ये चालू असतील तर लांछन आहे. आपल्या लोकन्यायालयांचे; गरिबांसाठी चालणाऱ्या मोफत कायदा सल्ला विभागाचे आणि राजाच्या कायदा व न्यायव्यवस्था विभागाचे, नंदुरबार-पिंपळनेरचे भिल्ल असोत की मेळघाटाचे कोरकू, नाहीतर चंद्रपूर-गडचिरोलीचे माडीया, या सर्वांपर्यंत स्वतंत्र भारताच्या संविधानाचा एखादा कवडसा देखील पोहचलेला नाही हेच खरे. जनावरांपेक्षा निपत्तर जीवन वाट्याला आलेल्या माणसांच्या जीवनात साध्यासाध्या गरजांसाठीही जीवनघेणा संघर्ष केल्याविना गत्यंतर नसते."[७] अशा भयानक प्रथासंदर्भातले वास्तव इतके भयानक असताना मात्र शासनाचे, कायद्याचे लक्ष या आदिवासी पाड्यांपर्यंत मात्र जात नाही हे डॉ. रुपा कुलकर्णी यांचे म्हणणे रास्तच आहे.

उषाकिरण आत्राम यांची 'अहेर' ही कथाही पेशवेकालीन जमीनदार, वतनदार त्याचा अन्यायाची कठोर कहाणी मांडणारी आहे. अहेराच्या नावाखाली जमीनदार आदिवासी नववधुला वाड्यावर बोलावून तिला साडीचोळी देऊन तिच्यावर बलात्कार करतात. जमीनदाराचा 'अहेर' घेतल्याशिवाय संसार सुखाचा होत नाही असा गैरसमज पसरवितात आणि त्याच्या नावाखाली अनेक स्त्रियांचा भोग घेतात.

नवीन लग्न झालेले जोडपे रमी आणि सोमा, रमीला ही सावकार वाड्यावर अहेर घेण्यासाठी बोलावतो, म्होरकी त्यांना सावध करते. आदिम एकी करतात, रमी पुढाकार घेते व या प्रथेचा बिमोड करण्याचा बनाव करतात. ठरल्याप्रमाणे रमी व सोमा वाड्यावर जातात, सोमाला बाहेर हाकलून सावकार

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

रमीचा उपभोग घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु कमरेत लपवून आणलेल्या कोयत्याने रमी त्याच्यावर वार करते आणि अहेराची ही प्रथा प्रतापराव पेशव्यांच्या मृत्युबरोबरच बंद होते.

या कथेसंदर्भात डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात,'' लग्नसोहळ्याच्या पहिल्याच रात्री जमीनदार सावकाराकडून लुटली जाणारी देखणी आदिवासी गोंड तरुणी 'अहेर' ह्या कथेत येते. पेशवाईच्या काळात शेठ सावकार आणि जमीनदार हे आदिवासी स्त्रियांशी कसा निच व्यवहार करीत ह्यांचे प्रत्ययकारी चित्रण ह्या कथेत आले आहे. लग्न लागले की, नव्या नवरीने साडी, चोळी आणि बांगड्यांचा अहेर घ्यायला वाड्यावर जायचे हा इथला रिवाज. कथेतील सोमा हा तरुण लग्न करतो, पण बायकोला वाड्यावर जाऊ देत नाही. तेव्हा खवळलेला प्रतापराव पेशवे सोमाला दरडावतो,''कारे पोट्या? लगन करायचं माहीत आहे, अन् जमीनदाराचा अहेर घेतल्याबिगर संसार करायची मनाई आहे. हे कसं ठाऊक नाही?'' तेव्हा सोमा हतबल होतो. नाइलाजास्तव त्याची पत्नी रमी जमीनदाराकडून वाड्यावर लुटली जाते. येथे कथेचा शेवट करताना आत्राम यांनी लुटल्या गेलेल्या रमीला चंडिकेप्रमाणे बनविले. ती नंतरच्या नववधूंना सतर्कतेचा इशारा देते. आदिवासींना एकजुट करण्यास सांगते, 'ऐका आदिवासींनो ह्यापुढे कोणीही आपली बायको, अहेर वा पुजेसाठी वाड्यावर पाठवायची नाही, तुमा साऱ्यांना ह्या निसर्गाची शपथ आहे''[८]

या अघोरी प्रथेला संघर्ष करुन पुढाकार घेऊन एक आदिवासी स्त्री ही प्रथा बंद पाडते. आणि 'आहेराचा बदला आहेर'' म्हणून सर्व आदिमाना आपली बायको सावकाराकडे न पाठविण्याचे आव्हान करते, आदिवासींना आलेल्या आत्मभानामुळे, एकजुटीमुळे आणि संघर्षप्रवृत्तीमुळे या प्रथेतून आदिवासी सुटू शकतो. हे एक प्रेरणादायी वास्तव लेखिका चित्रित करतात. या कथासंग्रहातील ही शीर्षक कथा आहे. त्यातील भाषा पात्र चित्रण इतके प्रभावी आहे. की डोळ्यासमोर ही पात्र चित्ररुपातच दिसत राहतात. कदाचित या कौशल्यामुळेच ती कथा शीर्षकस्थानी गेली असावी. आदिवासीची जंगलातील नैसर्गिकता, प्रतिमा बनून संपूर्ण कथेमध्ये वावरताना दिसतात. त्यामुळे आदिवासी भागातील वास्तव स्वरुप डोळ्यासमोरुन तळरुन जाते.

आदिवासी स्त्रियांच्या कथांमध्ये प्रामुख्याने दोनच स्त्रियांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत, त्यांनी त्यांच्या कथांमधून सावकारशाही, वेठबिगार, अनिष्ठ प्रथा अंधश्रद्धा, आदिवासींचे जीवन वास्तव, आदिवासींचे भूक, स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार, आणि आदिवासींची परिवर्तनवादी संघर्षमय लढाई अशा विषयांवर भाष्य केलेले आढळते. उषाकिरण आत्राम, आणि नजुबाई गावित या दोन्ही लेखिका आदिवासी समाजात जन्मल्या असल्यामुळे आदिवासी समाजाचे चित्रण अगदी हुबेहूब रेखाटताना या दोन्ही लेखिकांचे आदिवासींच्या साहित्य विश्वाची मुहूर्तमेढ रोवण्यापासून ते सक्षमीकरणापर्यंत फार मोलाचे योगदान आहे.

'अहेर' या कथासंग्रहातील कथांमधून घडणारे जीवनचित्रण स्वानुभवातून आलेले आहे. दु:ख, वेदना, अन्याय, अत्याचार, शोषण या कथांमध्ये रेखाटले आहे. धगधगत्या सामाजिक वास्तवाचे चित्रण करणाऱ्या या कथा आहेत. लेखनाबरोबरच स्वत:ला सामाजिक कार्यात झोकून देऊन समाजसेवेचे वृत्त अखंडपणे चालविणाऱ्या उषाकिरण आत्रामसारख्या लेखिका विरळच आहेत. धडाडीचे नेतृत्त्व व बिनधास्त लेखन व समाजपरिवर्तनाची आस या त्रिसूत्री भूमिकेमुळे लेखिकेच्या रुपाने आदिवासी स्त्रियांच्या लेखनाला व विकासाला चांगले दिवस येतील अशी आशा निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

नजुबाई गावित यांच्या कथासंग्रहामधूनही स्त्रियांचे दु:ख, अंधश्रद्धा, सावकारशाही, आदिवासी जीवनवास्तवाचे यथार्थ चित्रण त्या रेखाटतात. त्याची सामाजिक जाण आणि सूक्ष्मनिरीक्षण आदिवासींच्या व्यथा वेदनेला योग्य पद्धतीने रेखाटते. समाजातील आदिवासींचे स्थान अधोरेखित करुन परिवर्तनाची दिशा स्पष्ट

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
IRJMS
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

करते. लेखिका नजुबाई गावित यांच्या लेखनाची खोली अगाध आहे. दोन कांदबऱ्यांचा अनुभव पाठीशी असल्यामुळे कथासंग्रहातील निवेदनात येणारी सहजता वाचकाला आपलेसे करुन घेण्यास यशस्वी ठरते.

**समारोप**

आदिवासी कथा वाङ्मयाचा विचार करता दोनच स्त्रियांनी कथा लेखन केलेले आढळते. 'अहेर' आणि 'नवसा भिलणीचा एल्गार' या दोन कथासंग्रहांच्या व्यतिरिक्त उषाकिरण आत्राम यांनी आदिवासी भारत या नियतकालिकामध्ये 'आक्रोश' नावाची कथा इ.स.१९८४ मध्ये लिहिली आहे. सावकार आणि पोलीस यांच्या चक्रव्यूहात सापडलेली आदिवासी स्त्री, 'मुको' इचा मूक आक्रोश या कथेमध्ये शब्दबद्ध झाला आहे. तर या शिवाय कुसुम अलाम यांनी निपटारा दिवाळी अंकात इ.स.१९९९ मध्ये 'सुरंगस्फोट' नावाची कथा लिहिली आहे. हुंड्यासारख्या ज्वलंत सामाजिक प्रश्नामुळे आदिवासी जीवन कसे उद्ध्वस्त होते याची कहाणी मांडली आहे. या व्यतिरिक्त आदिवासी स्त्रियांचे कथालेखन सापडत नाही. आदिवासी स्त्रियांच्या कथा लेखनाचा आणि एकूणच आदिवासी साहित्यातील आदिवासी कथा वाङ्मयाचा प्रवास अल्पसा दिसत असला तरी यापुढे आदिवासींच्या जगण्याचे प्रश्न घेऊन त्यांचे जागतिकीकरणातील स्थान शोधून आदिवासी जीवन वास्तवाचे वास्तव स्वरुप घेऊन नवी पिढी, ह्यापुढे या कथेचे दालन समृद्ध, विस्तीर्ण आणि सक्षम केल्याशिवाय राहणार नाही.

**निष्कर्ष**

१. आदिवासी स्त्रियांची कथा जमीनदार, सावकार यांच्या भोगवादी वृत्तीवर भाष्य करते.
२. आदिवासी स्त्रियांची कथा समाजातील रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, वेठबिगार यांना वाचा फोडणारी आहे.
३. आदिवासी स्त्रियांची कथा, आदिवासी स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करते.
४. आदिवासी स्त्रियांची कथा, आदिवासींचे जीवन-वास्तव रेखाटते.
५. आदिवासी समाजातील भूकेचे वास्तवचित्र रेखाटणारी कथा आहे.
६. अन्यायाविरूद्ध संघर्ष हा सर्वच कथांचा आत्मा आहे.
७. आदिवासी स्त्रियांची फरपट मांडणारी कथा आहे.
८. कोणताही आडपडदा न ठेवता आदिवासींचे वास्तव चित्रण नजुबाईंच्या कथांमधून येते.
९. आत्राम यांच्या कथांमधून मात्र आदिवासींच्या वागण्यातील आदर्शवाद दाखवला आहे.
१०. परिस्थितीमुळे स्त्रियांची झालेली दोलायमान अवस्था ही कथा रेखाटते.
११. अन्याय सहन करणारी व आक्रमक होऊन प्रतिकार करणारी अशी स्त्रियांची दोन्ही रूपे या कथांमधून दिसतात.
१२. आदिवासी माणसांचे कष्टमय जीवनावर ही कथा भाष्य करते.
१३. भ्रष्ट पुढारी आणि अकार्यक्षम पोलीस यंत्रणेवर भाष्य करते.
१४. सावकार व जमीनदार यांच्या निष्ठूरपणावर भाष्य करते.
१५. प्रस्थापित समाजाच्या वैचारिक दुबळेपणावर भाष्य करते.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE * Pabal Tal. Shirur, Dist. Pune

Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

१६. आदिवासी कथा जातीयतेवर कोरडे ओढते.
१७. अनेक आदिमतेचे संदर्भ या कथांमधून येतात.
१८. आदिवासींच्या पुढील पिढ्यांमध्ये आत्मभान आल्याचे दिसते.
१९. आदिवासी कथा सावकारशाही, जमीनदारपद्धती उलथून टाकण्याचे आवाहन करते.
२०. आधुनिकतेकडे वाटचाल करताना दिसते.
२१. पात्र, प्रसंग, घटनांची गुंफण योग्यरित्या केल्यामुळे कथा वाचनीय झाली आहे.
२२. कथेच्या हेतूनुसार कथेमधील घटना-प्रसंगाची निर्मिती झाली आहे.
२३. वातावरणनिर्मितीचाही प्रभावी वापर केला आहे.
२४. कथेतील संवाद कथेची उंची वाढवितात.
२५. आदिवासी कथा, कथातंत्राला झुगारताना दिसते.

**संदर्भ**


१. *गारे गोविंद, आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे, सुगावा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, २००५. पृ.३८-३९*
२. *तत्रैव, पृ.१५*
३. *तत्रैव, पृ.४१*
४. *तुमराम विनायक, आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२०१२.पृ.२११*
५. *इंदुमती लहाने, अहेर, गोंडवाना-गोंडी साहित्य परिषद, नागपूर प्र.आ. १९९६. पृ.१-२*
६. *गावित नजुबाई, नवसा भिलणीचा एल्गार (प्रस्तावना), सुगावा प्रकाशन,पुणे प्र.आ. २०१३. पृ.७*
७. *गावित नजुबाई , उनि, पृ. ७.*
८. *सोंगटे तुकाराम, आदिवासी साहित्य चिंतन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे प्र.आ.२०१४ पृ. ५७-५८.*


SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.
Shri Padmamani Jain Arts & Commerce College Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403